# होमगार्डस - नाशिक जिल्हा

जिल्हा कोर्टाचे समोर, बिटको हायस्कुल शेजारी, नाशिकशहर -- 422002

दूरध्वनी क्रमांक - 0253-2578346 ई-मेल- dchgnashik@yahoo.com


जा.क्र./763/ होमगार्ड नोंदणी/2024 दिनांकः- 17/8/2024

मा. जिल्हा माहिती अधिकारी,
नाशिक.

विषयः- होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक बाबतची प्रेस नोट सत्वर प्रसिध्दीस देणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की,नाशिक जिल्हा होमगार्ड तर्फे नाशिक जिल्हयातील नाशिकशहर,निफाड,सिन्नर व ईगतपुरी याच पथकातील पुरुष व महिला अनुशेष भरुन काढण्यासाठी नविन होमगार्ड सदस्य नोंदणी करिता https//:maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेत स्थळावर फक्त इंग्रजी भाषेतुन दिनांक २६/७/२०२४ ते १४/८/२०२४ पावेतो अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि अर्ज केलेल्या उमेवारांना कागदपत्र पडताळणी व शारीरिक क्षमता चाचणी करिता दिनांक २२/८/२०२४ ते २७/८/२०२४ या कालावधीत दररोज सकाळी ०५.०० वाजता खालील प्रमाणे नमुद केलेल्या दिनांकास पोलीस अधिक्षक नाशिक ग्रामीण आडगांव येथे बोलविण्यात येत आहे.उमेदवारांना सकाळी ०५.०० ते १०.०० या कालावधी मध्ये मैदानात प्रवेश दिला जाईल.

| अ.क्र. | दिनांक | बोलविण्यात येत असलेले पथक | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १. | २२/८/२०२४ | नाशिक शहर पुरुष (महिला वगळून) | (रजिस्ट्रेशन नंबर १२ ते ५२२९) २५०० पुरुष उमेदवार |
| २ | २३/८/२०२४ | नाशिक शहर पुरुष (महिला वगळून) | ( रजिस्ट्रेशन नंबर ५२३४ ते ११२८९ ) ३०३७ पुरुष उमेदवार |
| ३. | २४/८/२०२४ | ईगतपुरी व सिन्नर पुरुष (महिला वगळून) | २०५७ पुरुष उमेदवार |
| ४. | २६/८/२०२४ | निफाड पुरुष (महिला वगळून) | १५३७ पुरुष उमेदवार |
| ५. | २७/८/२०२४ | सर्व महिला उमेवार | २०८२ महिला उमेदवार |

**टिप :- निफाड पथका करीता महिलांचा अनुशेष शिल्लक नसल्याने निफाड पथका करीता नोंदणी अर्ज भरलेले महिला उमेदवार अपात्र असणार आहेत.**

सदर नोंदणी फक्त नाशिक जिल्हयातील नाशिक शहर, ईगतपुरी, सिन्नर व निफाड पथकातील पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रहीवासी उमेदवारां करिता आहे, इतर जिल्हयातील व इतर पथकातील अथवा तालुक्यातील उमेदवार सदर नोंदणी करिता अपात्र आहेत. त्यामुळे नाशिक जिल्हयातील इतर पथकातील / तालुक्यातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमा करीता उपस्थित राहु नये. तसेच नाशिक जिल्हयातील इतर पथकात अनुशेष नसल्याने त्या पथकातील उमेदवाराना प्रवेश दिला जाणार नाही.

कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करिता येतांना ऑनलाईन अर्जासह कागदपत्राच्या आवश्यक छायांकित प्रती उमेवारांनी स्वतः स्वाक्षरी करुन अर्जासोबत जोडावे नोंदणीच्या दिवशी

अर्ज स्वतः उमेवाराने घेवुन यावे. तसेच एन.सी.सी. बी व सी प्रमाणत्र,आय.टी.आय. जिल्हा स्तरीय क्रिडा मध्ये प्राविण्य प्राप्त, जडवाहन चालक परवाना धारक व इतर अन्य तपशिलाच्या पुष्ठयार्थ सर्व संबंधित मुळ प्रमाणपत्र व नजिकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो नोंदणी वेळी सादर करणे बंधनकारक असेले. उमेवारास नोंदणीच्या ठिकाणी स्वखर्चाने यावे लागेल तसेच नोंदणीच्या वेळी किंवा प्रवासात काही अपघाती घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित उमेवाराची राहील.

उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणी मध्ये पात्र होणे करिता प्रत्येक प्रकारामध्ये ४० टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील (धावणे या प्रकारात किमान १० गुण व गोळाफेक या प्रकारात किमान ४ गुण आवश्यक )

सदर होमगार्ड सदस्य नोंदणी प्रक्रीया अत्यंत पारदर्शक व इन कॅमेरा पार पाडणेत येणार असुन होमगार्ड नोंदणी करिता उमेदवारांनी कोणत्याही अमिषाला बळी पडु नये. तसेच शिफारस/वशिला इ. गैरमार्गाचा वापर करु नये होमगार्ड नोंदणी करिता काणी पैसे/लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा. अपर पोलीस अधिक्षक नाशिक ग्रामीण व **मा.अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नाशिक, फोन क्रमांक ०२५३-२५७८२३०** यांचे कडे तक्रार करावी.

अतिवृष्टीमुळे वेळापत्रक मध्ये बदल झाल्यास त्याची सचुना या **https//:maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php** या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येईल त्यामुळे उमेवारांनी सदर संकेतस्थळावरील सुचना करिता अदयावत रहावे.

सदरची प्रेस नोट आपले मार्फत नाशिक जिल्हयातील लोकप्रिय दैनिकात विनामुल्य प्रसिध्द होणेस नम्र विनंती.

Adhyaditke

(आदित्य मिरखेलकर) (भा.पो.से.)
अपर पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण,
तथा, जिल्हा समादेशक होमगार्ड, नाशिक